# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.०६/०३/२०२३

दुखापत :—

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र २३२/२०२३<br>कलम ३२४, २९४, ५०६ भादवी | हमालपुरा अमरावती | घता वेळ दि. दि.०५/०३/२३ चे १४.०० वा ते १४.३० वा. दरम्यान<br>दाखल ता वेळ<br>दि.-०५/०३/२३ चे १७.०९ वा | ओमप्रकाश आचलप्रसाद चांडक वय ४२ वर्ष रा. शामनगर गल्ली नं ३, अमरावती | १)अनिल चवरे व २) अजय लांजेवार दोन्ही रा. हमालपुरा, अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे दुकानावर बसले असता यातील आोरापीतांनी तेथे येवुन फिर्यादी जवळ बोलावुन आम्हाला १००/- रु. ची दारु पाज असे म्हटले असता फिर्यादीने त्यास नकार दिला असता आरोपी क्र१ याने बाजुला पडलेला लोखंडी रॉड उचलुन फिर्यादीचे डाव्या पायावर टोंगळयाच्या खाली मारुन त्यास जख्मी केले तर आरोपी क्र.२ याने अश्लिल शिवीगाळ करुन बाजुला असलेला लाकडी रापटर उचलुन फिर्यादीचे डोक्यावर व उजव्या हातावर मारले व मारण्याच्या धमक्या दिल्या मेडी सर्टी वरुन फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

जबरी चोरी :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | वलगाव ८६/२०२३ कलम ३९२, ३४१,३४ भादवि. | ग्राम पुसदा ते शिराळा रोड आयसर पेट्रोल पंप समोर ०२ कि.मी.अंतरावर | दि ०५/०३/२०२३ चे ११/३० वा.ते १३/३० वा.<br>माहिती.<br>दि.०५/०३/२०२३ चे २०/०० वा.<br>दाखल<br>दि.०५/०३/२०२३ चे २१/२० वा. | रोशन नंदकिशोर खोब्रागडे वय २७ वर्ष रा.लसनापुर ता.चांदुर बाजार जि.अमरावती. | १) अज्ञात मो.सा.क्र.MH२७ AV७०४२ चा चालक<br>अज्ञात<br>अधिक एक मो.सा.चालक व एक ईसम असे तिन ईसम<br>अज्ञात | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घठना ता.वेळी व ठीकानी फिर्यादी हे हरबरा विक्रिचे पैसे घेवुन दुचाकी मो.सा.क्र.MH २७AM ७२५२ ने अमरावती वरुन गावाकडे जात असतांना .पुसदा ते शिराळा रोड वर आयसर पेट्रोल पंप वर पेट्रोल भरुन पुढे ०२ कि.मी.शिराळा कडे गेल्या नंतर मागुन दोन मो.सा.आडव्या आल्या व त्यानी फिर्यादीस थांबुन गाडीवरुन ओढुन बाजुच्या शेतात नेले. तेथे त्यांची मारहान झाली व फिर्यादीचे डोक्यावर ठोसा मारुन फिर्यादी खाली पडला. त्यातील एकाने फिचे. खिशातील नगदि ३३,०००/रु काढुन घेतले. त्यानंतर काय झाले फिर्यादीस माहीत नाही. दुपारी ०१/३० वा.फिर्यादीस जाग आला तेव्हा फिर्यादीच्या खिशातील पैसे दिसले नाही. फिर्यादीने आजु बाजुला मागे पुढे शोध घेतला. फिर्यादीस त्याचा बंद पडलेला मोबाईल दिसला व फिर्यादीची दुचाकी खाली पडलेली दिसली. नतंर फि.ने.जावाई यांना घडलेली घटना फोन करुन सांगितली .त्या पैकि एक अज्ञात ईसमाचा मो.सा.क्र.MH२७ AV ७०४२ असा आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

वाहनचोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्र २३३/२०२३ कलम ३७९ भादवी | नवाथे चौक, अमरावती | दि.०३/०३/२३ चे १९.०० वा ते १९.३० वा. दरम्यान<br><br>दि.-०५/०३/२३ चे १८.२१ वा | आशिषकुमार रामयज्ञ यादव , वय ३२ वर्ष रा. साईनगर, अकोली रेल्वे स्टेशन जवळ, अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने त्यांची लाल काळया रंगाची हिरो कंपनीची स्लेंडर दुचाकी क्र एम एच २७ डि जी ३६९६ इंजीन क्र **HA11EYN4500383** व चेसीसी क्र **MBLHAW121N4F00335** किं अं ५०,०००/- रु. ही नवाथे चौक अमरावती येथे अंडाबुर्जी खाण्याकरीता पार्कीग मध्ये लॉक करुन गेला असता काही वेळाने आला असता पार्कीग मध्ये लावलेली गाडी दिसुन आली नाही यावरुन फिर्यादीने इतरत्र शोध घेतला परंतु मिळुन आली नाही. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

चोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र. १८७/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि. | झिरी मंदिर परिसरात माँ कनकेश्वरी चे प्रवचन स्थळ बडनेरा | दि.०५.०३.२०२३ चे १४.०० वा.<br>माहिति ता.वेळ - दि.०५.०३.२०२३ चे १७.०० वा.<br>दाखल ता.वेळ - दि.०५.०३.२०२३ चे १७.४२ वा. | एक महिला | संशइत<br><br>०४ महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि. ही माँ कनकेश्वरी चे प्रवचन कार्यक्रम करिता गेली होती व प्रवचना नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होता महाप्रसादाच्या कार्यक्रमाला एकाचवेळी गर्दी उठली. तेव्हा महिलांची एकमेकांना लोटलाट सुरु झाली. तेवढ्यातच फि.ला गळयातील मंगळसुत्र ओढल्याचे जाणवले. म्हणुन फि.ने पाहिले असता तिला तिच्या गळयात मंगळसुत्र दिसुन आले नाही. तेव्हा अनेक महिलांची सुध्दा एकच धांदल उडाली. १) एक महिला वय- ७५ वर्ष रा. लढ्ढा प्लॉंट नवी वस्ती बडनेरा यांची २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी असलेली पोत, २) एक महिला वय- ६० वर्ष रा. मसानगंज अमरावती यांची २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे चैन लॉकेट ३) एक महिला वय- ६५ वर्ष रा. जयस्तंभ चौक नवी वस्ती बडनेरा यांची १८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन ४) एक महिला वय- ६५ वर्ष रा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जयस्तंभ चौक नवी वस्ती बडनेरा यांची १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असे इतर चार महिलांचे सुध्दा दागिने चोरी गेल्याचे फिस समजले. मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटनेची बोंबाबोंब झाली तेव्हा तेथुन चार अनोळखी महिला मंडपाच्या बाहेर घाईगडबडीने निघुन जात असतांना दिसल्याचे लोकांना त्या महिलांवर चोरीचा संशय आला लोकांनी तेथे ड्युटीवर असलेल्या पोलीसांना माहिती दिली जमलेल्या लोकांनी व पोलीसांनी त्या चार अनोळखी महिलांना ताब्यात घेतले. त्या महिलांचे नाव वरील प्रमाणे आहे. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

प्राणांतिक अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | मृतकाचे नाव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| १ | बडनेरा अप.क्र.१८६/२३ कलम २७९, ३०४(अ) भा.दं.वि. | अंजनगावबारी रोडवरील नाल्याचे पुलाजवळ | घटना ता.वेळ - दि.१०.०२.२०२३ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान<br><br>माहिती ता.वेळ - दि.०५.०३.२०२३ चे १६.४५ वा.<br><br>दाखल ता.वेळ - दि.०५.०३.२०२३ चे १७.१६ | दादाराव पहलवान जावरकर य- ५० वर्ष रा. सत्ती ता.चिखलदरा जि.अमरावती | मो.सा.क्र.MH२९BT १४५५ चा चालक | विजय दादाराव जावरकर वय- २६ वर्ष रा. सत्ती ता.चिखलदरा जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील मृतक व सोमाजी जावरकर अंजनगावबारी गावातुन विटाभट्टी कडे पायदळ जात असतांना नाल्याचे पुलाजवळ अंजनगावबारी गावाकडुन दुकाची क्र. MH२९BT१४५५ चे चालकाने आपली ताब्यातील गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मृतकास मागुन धडक मारली. व मो.सा.स्वार सुध्दा पडला. मृतक याचे डोक्यावर व इतर शरीरावर मार लागला. त्याला उपचाराकरिता ईर्विन दवाखाना येथे इलाजा करिता भर्ती केले व नंतर नागपुरला उपचार करिता भर्ती केले उपचारा दरम्यान दि.१२.०२.२०२३ रोजी दुपारी मरण पावला. अशा लेखी रिपोर्ट वरुन व मर्ग क्र.१४/२३ कलम १७४ जाफौ चे चौकशीवरुन सदरचा गुनहा दाखल |

इतर :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | . फ्रेजरपुरा १८४/२०२३ कलम २८५ भा. द. वि. | यशोदा नगर पेट्रोल पंपाजवळ, अमरावती. | दि. ५.३.२०२३ चे २०.२५ वा. दरम्यान. दि. ५.३.२०२३ चे २१.३० वा. दाखल ता वेळ - दि. ५.३.२०२३ चे २२.१३ वा. | सरतर्फे पो. हे.कॉं. सुनिल सोळंके, ब. नं. २८९, पो.स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर. | महेंद्र वामनराव कंठाले, वय ३० वर्ष, रा. यशोदा नगर नं. २, अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व सोबत पो. स्टाफ सह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद आरोपी हा त्याच्या ताब्यातील चार चाकी हातगाडीवर स्टोव्हवर अंडाबुर्जी बनविण्यासाठी स्फोटक पदार्थचा सार्वजनीक ठिकाणी रस्त्यावर जाणा-या येणा-या लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने वापर करतांना मिळुन आला. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | कोतवाली अप क्र११०/२३ कलम २९४, ५०६, ३४ भादवी | जोशीमार्केट समोर शाम चौक अमरावती | घ.ता.वेळ दि.०५.०३.२०२३ चे १५.३० वा दरम्यान दा.ता.वेळ दि. ०५.०३.२०२३ चे १७.४० वा | एक महिला | १.ऑटो क्र MH-२७-B-८३३ चा चालक २. अज्ञात आरोपी क्र २ दोन्ही आरोपीचे नाव व पत्ता माहीत नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी ही जोशी मार्केट येथे खरेदी करण्यास आली असता व खरेदी करुन तीची ज्युपीटर मोपेड गाडी रोडवरुण काढत असता फिर्यादीला मागील वाहन दिसत नसल्याने तीचे मोपेडचा धक्का .ऑटो क्र MH-२७-B-८३३ ला लागल्याने सदर ऑटो चालकाने फिर्यादीस अश्लील शिवीगाळ केली व सदर घटनेचे फिर्यादी फोटो काढत असतांना तेथे ऑटो चालकाचा एक साथीदार येवुन फिर्यादीला फोटो काढु नका असे म्हणुन व्यत्यय केला व ऑटोचालकाने शिवीगाळ करुन फिर्यादीस मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोट वरुण सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हीबीशन -

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | नांदगाव पेठ | अप क्र. ९१/२०२३ कलम ६५(ई) (फ) म दा का | शिवाजी चौक रहाटगाव ता.जि.अमरावती | दि.०५/०३/२३ चे १८/०० वा. ते २०/३० वा. | दि.०५/०३/२३ चे २२/३१ वा. | सरतर्फे पो.उपनि. रवि देशमुख पो.स्टे. नांदगाव पेठ | रितेश काशीराम सरैय्या वय ४० वर्षे रा. शिवाजी चौक रहाटगाव ता.जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि घटना ता. वेळी व ठिकाणी पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली कि एक इसम हा शिवजी चौक रहाटगाव येथे अवैद्यारीत्या विनापरवाना देशी दारुची विक्री करीत आहे. अशा माहीती वरुन नमुद इसमावर प्रो-रेड केली असता त्याचे ताब्यातुन २५ नग ९० एम.एल. च्या देशी दारु सेत्रा बॉबी प्लास्टीकच्या शिश्या किंमत १०००/- रु चा माल मिळुन आला. अशा फिर्यादी यांचे लेखी फिर्यादी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | वलगाव | 87/2023 कलम ६५ (ई) म.दा.का. | ग्राम पुसदा नाल्या जवळ पान ठेला. | दि.०५/०३/२०२३ चे १८/४५ वा. | दि.०५/०३/२०२३ चे २२/५८ वा. | ASI दादु दहिकर ब.न.९१९ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | संजय भगवान इंगळे वय ५६ वर्ष रा.ग्राम पुसदा.ता.जि.अमरावती. | कलम हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी गुप्त बादमी दारा कडुन माहीती मिळाली कि,ग्राम पुसदा नाल्या जवळ पान ठेल्या मध्ये एक ईसम अवैद्या रित्या विना परवाना देशी दारुची विक्री करीत आहे.असा माहि वरुन आमी व सोबत पंच असे सदर आरोपि वर प्रो रेड करणे करणे कामी ग्राम पुसदा येथे गेलो असता.सदार आरोपि ला जागीच पकडुन ताब्यात घेतले.त्याचे कडे असलेल्या पांढ-या पिशवित ची पाहनी केली असता.त्या मध्ये ९० मिली.च्या १५ नग देशी दारु पावट्या कि.अ.५२५ /रु चा माल मिळुन आला.सदर आरोपि चे कृत्य कलम ६५ ई म.दा.का.प्रमाने होत असल्याने सदर आरोपि विरुध्द माझी कायदेशीर तक्रार आहे.अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| ४ | खो. गेट | ४६/२३ कलम ६५(ई) म.दा.का | मावदे प्लॉट निळकंठ शाळे समोर, भातकुली रोड अमरावती | ०५/०३/२०२३ चे १९-०० वा. ते १९-३० वा. दरम्यान | ०५/०३/२०२३ चे २०-३५ वा. | ना. पो. कॉ. सुधिर प्रांजळे ब.नं. ९३३ पो. स्टे. खोलापुरी गेट अमरावती | शिवा शेषराव सरदार वय २५ वर्ष रा. मावदे प्लॉट, निळकंठ शाळेसमोर, भातकुली रोड अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो. स्टॉफ सह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीती वरुन यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता नमुद आरोपी हा देशी दारुच्या वापट्यांची विक्री करतांना मिळुन आला त्यास पो. स्टॉफ चे मदतीने ताब्यात घेवुन त्याच्या हातातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारु टॅंगो पंच ९० मिली च्या २० नग सिलबंद पावट्या कि. अं. ७०० रु. चा माल मिळुन आला . सदर आरोपीस दारु बाळगणे व विक्री करण्याचा परवाना विचारला असता त्याने उडवा उडविची उत्तरे दिली. आरोपीच्या ताब्यात मिळुन आलेला माल पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |